# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री.जगन्नाथ पांडुरंग पाटील,<br>मु.पो. बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय क्र. १, इस्लामपूर, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री.जगन्नाथ पांडुरंग पाटील, मु.पो.बोरगांव, ता. वाळवा, जि.सांगली यांनी पोष्टाने मंचाकडे दि. ११.१.२०१० रोजी तक्रार दाखल केली. त्यामध्ये दि. २१.९.२००९ च्या तक्रारीचा उल्लेख आहे. अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. ५.९.२००९ रोजी क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली. तक्रारदाराचे वीज कनेक्शन दि. १.९.२००९ रोजी बंद करण्यात आले आहे. दि. ८.९.२००९ च्या अर्जाने विनंती करुनही सुरु करण्यात आले नाही. त्यामुळे वीज कनेक्शन बंद केलेपासून ते चालू करेपर्यंत भरपाई मिळावी, संबंधित दोषी अधिकारी यांचे पगारातून भरपाईची रक्कम वसूल करावी व रु. १०,०००/– नुकसान भरपाई, दंड, प्रवास खर्च व वकील फी यासाठी मिळावी अशी मागणी केली आहे.

प्रस्तुतच्या दि. ११.१.२०१० च्या तक्रारीनुसार अंतर्गत कक्षाचे आदेश झाल्याचे दिसते, ते तक्रारदार यांस मान्य नाहीत. प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर दि. ५.४.२०१० रोजी ठेवण्यात आली. तक्रारदाराने पोष्टाने अर्ज पाठवून तारीख वाढवून मागितली, त्यानुसार मुदत देण्यात आली.

वितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता, इस्लामपूर यांनी आपल्या दि. २६.३.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदार यांनी रु. ८९७०/– दि. १७.३.२०१० रोजी भरले असल्याचे म्हटले आहे. सुनावणीचे दिवशी दि. ५.४.२०१० रोजी तक्रारदार गैरहजर. वि.प.चे सहाय्यक अभियंता, उप विभाग क्र. १, इस्लामपूर उपस्थित. त्यांनी दि. ८.४.२०१० चे पोष्टाने लेखी म्हणणे पाठवून तक्रारदार तक्रार मागे घेत असल्याचे पत्र दिले व तक्रार निकाली काढण्यात यावी अशी लेखी विनंती केली. अर्जदाराच्या पत्रावर दोन साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यानंतर दि. ९.४.२०१० ला मंचासमोर प्रत्यक्ष हजर राहून कागदपत्रें दाखल केली. सहाय्यक अभियंता, इस्लामपूर यांनी दि. ४.५.२०१० च्या आपल्या पत्राने तक्रारदाराचे दि. ३.५.२०१० चे तक्रार मागे घेत असल्याचे मंचाला अग्रेषित केलेले व तक्रारदाराची सही असलेले पत्र पाठविले आहे. अर्जदाराने अपील काढून टाकणेबाबत हूकूम व्हावा अशी विनंती केली आहे. यावरुन तक्रारदाराचे तक्रारीचे निवारण झाल्याचे दिसते व त्याने तक्रार मागे घेतल्याने निकाली काढणे योग्य होईल. खालील प्रमाणे आदेश –

तक्रारदाराने सुनावणीस उपस्थित राहण्यास अर्जाद्वारे तारीख वाढवून मागितली. वितरण कंपनीने म्हणणे दिल्यानंतर तक्रारदाराने वेगवेगळे ३ अर्ज मंचाकडे दाखल केले त्यामुळे विलंब झाला आहे.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ५.५.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :